# इजिप्त : नवीन गुंतागुंत

चंद्रशेखर पुरंदरे

अरब वसंताचे वारे इजिप्तमध्ये पोचल्यावर दोन वर्षांपूर्वी होस्ने मुबारक हा हुकूमशहा पदच्युत झाला. (१९८१ ते २०११ पर्यंत सत्तेवर). त्याबरोबरच लष्कराने सत्ता ताब्यात घेतली. मग इजिप्तमध्ये प्रथमच सार्वत्रिक निवडणुका झाल्या, अध्यक्षीय निवडणुका झाल्या. १९५४ पासून बंदी असणारी पण भूमिगत राहून सक्रिय असणारी मुस्लीम ब्रदरहूड ही संघटना दोन्ही निवडणुकांत यशस्वी झाली. मोहम्मद मोर्सी हा त्यांचा उमेदवार ५२% मते मिळवून अध्यक्ष झाला. त्याचा विरोधक मुबारकच्या काळातील एक लष्करी अधिकारी होता. त्याला ४८% मते मिळाली हे लक्षणीय.

कोणत्याही हुकूमशाहीसारखी इजिप्तच्या संदर्भातही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे निष्पक्षपाती न्यायसंस्था, नोकरशाही, सार्वभौम संसद या संस्था खऱ्या अर्थाने अस्तित्वात नसतात. असतात त्या हुकूमशहाची री ओढणाऱ्या नामधारी संस्था. (त्यात अगदी १९५२ पासून नासर, सादात व मुबारक हे तीनही राष्ट्राध्यक्ष आधीचे लष्करी अधिकारी होते.) स्वतःच्या बळावर उभी असणारी अधिकृत व शिस्तबद्ध संस्था एकच - लष्कर. इजिप्तचे लष्कर अमेरिकेने पोसलेले आहे. यावर्षीची मदत सुमारे एक बिलियन डॉलर्स आहे.

पाकिस्तानप्रमाणेच इजिप्तचे लष्कर देशाच्या संरक्षणाबाहेरही (किंबहुना बाहेरच जास्त!) सक्रिय असते. उच्चपदस्थ लष्करी अधिकाऱ्यांचे खासगी व्यापारी संबंध देशाची अर्थसंस्था नियंत्रित करण्याइतके खोल व विस्तृत आहेत. जोपर्यंत हे संबंध शाबूत असतात, तोपर्यंत लष्कर राजवट टिकू देते. लोकांच्या रेट्यामुळे मुबारक हे संबंध टिकवू शकणार नाही असे लक्षात आल्यावर लष्कराने त्याला बाजूला केले व राज्य हातात घेतले. पण पडद्यामागून सत्ता नियंत्रित करणे निराळे आणि प्रत्यक्ष सत्ता राबवणे निराळे.

भ्रष्टाचार, ४०% पर्यंत तरुणांची बेरोजगारी व दिशाहीन आणि डळमळीत अर्थव्यवस्था या कारणांनी लोक रस्त्यावर आले आणि मुबारकला जावे लागले. या प्रश्नांना उपाय शोधणे आपल्या आवाक्याबाहेर आहे हे लक्षात आल्यावर राजकीय संस्थेचे महत्त्व लष्कराला कळले व निवडणुका झाल्या. संसद आली आणि अध्यक्ष आला. सत्तेवर आल्यावर मोर्सीने एक चांगला प्रयत्न केला. दुसरा प्रयत्न चुकीच्या दिशेने केला व बाकी चुकाच जास्त केल्या. चांगला प्रयत्न म्हणजे त्याने लष्कराची देशाच्या अर्थव्यवस्थेवरील पकड कमी करण्याचा प्रयत्न केला. पण मुबारकच्या काळातील अत्याचारांना लष्कराला जबाबदार धरले जाणार नाही असा कायदा लष्कराने करून घेतला. मात्र आपले व्यापारी संबंध मोर्सी धोक्यात आणते आहे हे लक्षात आल्यावर लष्कर अस्वस्थ झाले.

दुसरा अर्धवट प्रयत्न म्हणजे वर म्हटलेल्या लोकशाहीच्या आधारस्तंभ संघटनांत मोर्सीने ब्रदरहूडची मंडळी घुसवायला सुरूवात केली. त्यामुळे लष्कर बिथरले. तसेच व्यवस्थेत खोल पाळेमुळे असणारे मुबारक समर्थकही बिथरले. त्यांना हुसकावून लावून लायक व्यावसायिकांनी ती पदे भरणे हा योग्य मार्ग होता. मुळात ब्रदरहूड काही सगळ्या इजिप्तचे प्रतिनिधित्व करत नाही. त्यांनी कोणताही ठोस आर्थिक कार्यक्रम दिलेला नाही. मुबारक द्वेष आणि कडवा इस्लाम हेच त्यांचे कार्यक्रम. त्यामुळे त्यांच्या शिरकावाने लोकही नाराज होऊ लागले.

सगळ्यात महत्त्वाची चूक म्हणजे मोर्सीने बहुसंख्य सामान्यांना दुखवले. लोकशाही भक्कम उभी रहावी म्हणून त्याने संस्थानिर्मितीचा प्रयत्न सुरूही केला नाही. नवनिर्वाचित नेत्याने पोखरलेली व्यवस्था सुधारावी, टंचाई व महागाई कमी करावी, चलन स्थिर ठेवावे या सामान्य माणसाच्या अपेक्षा. या साऱ्या अपेक्षांबाबत मोर्सी अक्षम ठरला. त्याबरोबरच तो दुराग्रही व कडवा धर्मनिष्ठ असल्याचे स्पष्ट होऊ लागले. बहुमताच्या जोरावर घटना बदलणे, या बदलाला कोर्टात आव्हान देता येऊ नये अशी घटनादुरुस्ती करणे या कृत्यांमुळे सहानुभूतदार इतर पक्षही सरकारमधून मागच्या नोव्हेंबरला बाहेर पडले. त्यात या वर्षभरात देशातील गुन्हेगारी तिपटीने वाढली. सद्दामच्या पाडावानंतर इराकमध्ये अराजक माजले. त्याच्या कारकीर्दीत सामान्य माणसाच्या किमान गरजा तरी भागत होत्या आणि सामाजिक सुरक्षा होती असे म्हटले जाऊ लागले. तीच परिस्थिती इजिप्तमध्ये मोर्सीच्या वर्षभरातच आली. वीज, डिझेलच्या टंचाईने उद्योग, शेती, घरगुती जीवनमान हां हां म्हणता बिघडू लागले. या कर्तृत्वामुळे सामान्य माणूस परत रस्त्यावर आला.

भारतासारखाच इजिप्शियन समाज बहुजिनसी आहे. इजिप्त उद्योग-व्यापारामार्गे पश्चिमेसारखे विकसित राष्ट्र व्हावे अशी अपेक्षा असणारा एक वर्ग, राजकीयदृष्ट्या उदारमतवादी वर्ग, निधर्मी, मवाळ मुस्लीम, जहाल व अतिजहाल मुस्लीम आणि अल्पसंख्यांक

असे अनेक गट या समाजात आहेत. राष्ट्राचा अध्यक्ष या सगळ्या गटांना बरोबर घेऊन जाणारा असणे अपेक्षित असते. मुबारकविरोधात हे गट एकत्र आले आणि त्यांनी मोर्सीला निवडूनही आणले. पण मोर्सी सुन्नी मुस्लीम धोरण राबवू लागल्याने ख्रिश्चन व शियापंथीय मुस्लीम या अल्पसंख्याकांवरचे हिंसक अत्याचार अचानक वाढू लागले. या आर्थिक व सांस्कृतिक कारणांनी जनमत मोर्सीविरोधी झाले.

या ३० जूनला मोर्सीला सत्तेवर येऊन एक वर्ष झाले. मोर्सीने सत्ता सोडेपर्यंत रस्त्यावरच धरणे धरण्याच्या निश्चयाने त्यादिवशी साडेआठ कोटी लोकसंख्येच्या देशातील दीड कोटी लोक देशभर रस्त्यावर आले. कैरोतील तहरीर चौकात मुबारकविरोधात जसे दोन वर्षांपूर्वी काही लाख लोक आले होते, तसेच आताही आले. मात्र त्यावेळी ब्रदरहूडची मंडळी आणि इतर एकत्र होते. यावेळी ब्रदरहूडचे समर्थक कैरोतच दुसऱ्या ठिकाणी जमा झाले. मोर्सी लोकशाही मार्गाने निवडून आलेला अध्यक्ष आहे आणि तो सत्तेवर राहिला पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. हे दोन समुदाय एकमेकांविरुद्ध आमने सामने आल्यास संघर्षाला हिंसक वळण लागणे सहजशक्य होते. मग इजिप्तमध्ये यादवीच सुरू झाली असती. म्हणजे, मोर्सीच्या सत्तेत राहण्याने देश उभा दुभंगला. त्यामुळे एकमेव सलग संस्थेने - लष्कराने - पुढच्या ४८ तासांत मोर्सीने वर्तन सुधारावे असा इशारा दिला. 'मी निर्वाचित व वैध अध्यक्ष आहे. मेलो तरी सत्ता सोडणार नाही' असा पवित्रा मोर्सीने घेतला. मग लष्कराने त्याला आणि ब्रदरहूडच्या तीनशे नेत्यांना ताब्यात घेतले आणि सत्ताही ताब्यात घेतली. ब्रदरहूडचे टीव्ही चॅनेल्सही बंद करण्यात आले. सरन्यायाधीशाची हंगामी अध्यक्ष म्हणून नेमणूक केली. त्याने उपाध्यक्ष म्हणून नोबेल पारितोषिक विजेता अल् बारदाई याची नेमणूक केली. अल् बारदाई पंतप्रधान होणार होता पण एका अतिजहाल मुस्लीम गटाने त्याच्या नेमणुकीला आक्षेप घेतला. कारण तो उदारमतवादी मानला जातो.

मोर्सीला जेथे स्थानबद्ध केले आहे (असा समज आहे) त्या इमारतीबाहेर ब्रदरहूडची मंडळी ठाण मांडून बसली. ८ जुलैला पहाटे हे लोक नमाज पढत असताना लष्कराने त्यांच्यावर गोळीबार केला. हा गोळीबार शेजारच्या इमारतींच्या छतांवरून केला गेला. लष्कराचा दावा असा की समूहातील काही जणांनी लष्करावर सशस्त्र हल्ला केला, त्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली. हा दावा खोटा दिसतो. या हिंसाचारात ५१ लोक मरण पावले, तीनशेहून अधिक जखमी झाले. या घटनेमुळे मोर्सीविरोधात लष्कराला पाठिंबा देणारे इतर गट लष्कराच्या विरोधात गेले.

मोर्सी समर्थक ब्रदरहूडचे अनुयायी बहुसंख्य नसले तरी नगण्य नक्कीच नाहीत. त्यांची हिंसक उपद्रवशक्तीही तीव्र आहे. हा प्रमुख संघटित गट. लष्कर हा दुसरा संघटित गट. उरलेले बहुसंख्य सामान्य मोर्सी विरोधक. त्यांनी रस्त्यावर येऊन आपली ताकद दाखवली. या ना त्या कारणाने मोर्सी नको हा यांचा अजेंडा. अशाच पण इंटरनेट-मोबाईल फोनवर मोर्सीविरोधात एकत्र आलेल्या तामेरॉड नावाच्या गटाने सव्वा दोन कोटी लोकांचा पाठिंबा मिळवला. हा असंघटित विरोध आहे. पण यावरून लोकक्षोभाची कल्पना यावी. हे प्रमुख गट सोडता अतिजहाल मुस्लीमांचा एक गट (त्याला निवडणुकीत २५% हून अधिक मते मिळाली होती), मग वर म्हटलेले अल्पसंख्यांक. या सगळ्यांची मोट बांधणारे सरकार येईल का आणि केव्हा येईल हे आजमितीला अनिश्चित आहे.

इजिप्तची सद्यस्थिती अशी आहे. या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय पदर आहेत. अमेरिकेच्या छुप्या पाठिंब्याखेरीज सत्तांतर करायला लष्कर धजावलेच नसते. मोर्सीचा खुला मुस्लीमधार्जिणेपणा अमेरिका व पश्चिम यांना खुपतच होता. पण इस्रायलचे अस्तित्व मान्य करणारा, इस्रायलशी अनाक्रमणाचा करार असणारा एकमेव व सुएझ कालवा हा आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्त्वाचा मार्ग अखत्यारीत असणारा इजिप्त हा मध्यपूर्वेतील महत्त्वाचा देश आहे. त्यामुळे तेथील राजवट अमेरिकेला आपल्या सोईचीच असणे आवश्यक आहे. म्हणून हा लष्करी हस्तक्षेप 'उठाव' म्हणायला अजून अमेरिका तयार नाही. कारण 'उठाव' म्हटले तर अमेरिकन कायद्यानुसार लष्करी मदत बंद करावी लागेल.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आखलेली आर्थिक धोरणे मोर्सीच्या सरकारने राबवली नाहीत म्हणून ते साडेचार बिलियन डॉलर्सचे कर्ज अडकले आहे. दरम्यान शिया इराणला शह म्हणून सुन्नी इजिप्तला सुन्नी कटारने आठ बिलियन डॉलर्स मदत केली. म्हणून देश तरी दिवाळखोर झाला नाही. आता सत्तापालट होताच कटारच्या विरोधात असणारी सौदी अरेबिया व युएई ही दुसरी श्रीमंत सुन्नी राष्ट्रे आणखी आठ बिलियन डॉलर्स लष्करी राजवटीला द्यायला सरसावली आहेत. कारण मोर्सी-मुस्लीम ब्रदरहूड थाटाचा आक्रमक सुन्नी इस्लाम आपल्याकडे आला तर आपल्या हुकूमशाही राजवटींना धोका आहे हे त्यांनी ओळखले आहे.

पैशाची ही सुन्नी चढाओढ अर्थातच पश्चिमेला आवडत नाही आणि ती पश्चिमेच्या नियंत्रणाबाहेर आहे.

एकूण चित्र पाहता काही महत्त्वाचे मुद्दे पुढे आलेले दिसतात. एक म्हणजे इस्लाम व लोकशाही एकत्र नांदू शकतात का? पश्चिम 'नाही' या उत्तरापर्यंत आली आहे. दुसरा मुद्दा म्हणजे ब्रदरहूडची गळचेपी झाल्यास ते जरा मवाळ मुस्लीम जहाल होऊ शकतात. कारण लोकशाही मार्गाने सत्ता मिळवली तरी वर्षभरातच 'अश्रद्ध' बहुसंख्य सत्ता सोडायला भाग पाडतात, असा त्यांचा ग्रह होऊ शकतो. मग लोकशाही निवडणुकाच नाकारण्याकडे त्यांचा कल

*(पान ३० वर)*

***जगभर*** *(पान ९ वरून)*
जाऊ शकतो. तिसरा मुद्दा जरा तात्त्विक आहे, तात्त्विक म्हणजे अवास्तव या अर्थी. तो म्हणजे एक प्रकारच्या झुंडशाहीने निर्वाचित सरकार पाडणे, लोकशाहीच्या दृष्टीने कितपत श्रेयस्कर आहे?

इजिप्त हे सगळ्यात मोठे अरब राष्ट्र आहे. तेथील घडामोडी मध्यपूर्वेत, विशेषत: ट्युनिशिया, येमेन, लिबिया या 'अरब वसंता'तील इतर देशांसाठी उद्‌बोधक ठरतात. त्याबरोबरच आपले व्यापारी हितसंबंध राखणे, नामधारी तरी लोकशाहीची भलावण करणे, इस्रायलचे रक्षण करणे, सौदी-यु.ए.ई-कटार अशा हुकूमशाह्या शाबूत राखणे ही कसरत पश्चिमेला अवघड जाताना दिसते. वर्गचिकित्सा आणि सुन्नी-शिया वैर या अनुषंगाने या प्रश्नाचा अभ्यास होणे आवश्यक दिसते. साम्राज्यवाद ही संकल्पना या संदर्भात शिळी दिसते. कदाचित लोकप्रतिनिधी नादान निघाल्यास त्याचे प्रतिनिधित्व रद्द करण्याचा घटनात्मक अधिकार मतदारांना असेल, तर अशी परिस्थिती उद्‌भवणार नाही. त्याबरोबरच एक वर्ष हा काळ देश बदलण्यासाठी कमी वाटतो. त्यादृष्टीने लोकांचा असंयमही तपासायला हवा.